# तपासणीसाठी नमुना घ्यावयाची पध्दत

# माती परिक्षण

## माती तपासणीसाठी नमुना घेताना घ्यावयाची दक्षता :-

- मातीचा नमुना पिके काढल्यानंतर किंवा पेरणीपूर्वी किंवा खते दिल्यानंतर तीन महिन्यानंतर घ्यावा
- मातीचा रंग, खडकाळपणा, बागाईत / जिराईत, स्थितीनुसार शेताचे वेगवेगळे भाग पाडावेत आणि त्या प्रत्येक भागातील मातीचे वेगवेगळे परिक्षण करुन घ्यावे.
- मातीचा नमुना घेण्यासाठी जनावरे बसण्याची जागा, खते व कचरा टाकण्याची जागा, दलदलीचे ठिकाण, जुने बांध मोठ्या झाडाखालील क्षेत्र कंपोस्ट खड्ड्याची जागा, पाण्याच्या पाटाची जागा इ. टाळावी.
- मातीचा नमुना भरण्यासाठी वापरात घ्यावयाची कापडी / प्लॉस्टिक पिशवी ही शक्यतो नविन वापरावी. यापूर्वी ती पिशवी खते, रसायने इ. साठी वापरात आणलेली नसावी.
- मातीचा नमुना घेण्यासाठी स्वच्छ अवजारांचा वापर करावा ती तांबरलेली नसावीत.
- संत्रावर्गीय पिकांसाठी ठिबक पासून 1 फुट अंतरावर 8 ते 10 ठिकाणची माती तपासणीसाठी पुढीलप्रमाणे घ्यावी.

## माती तपासणीसाठी नमुना घ्यावयाची पध्दत

- निवडलेल्या जमिनीच्या प्रत्येक विभागात नागमोडी रेषा काढून प्रत्येक वळणावर इंग्रजी 'व्ही' (V) आकाराचा खड्डा घ्यावा. हंगामी पिकासाठी 20 सें.मी. खोल खड्डा, ऊस, कापूस इ. नगदी पिकांसाठी 30 सें.मी. व फळपिकासाठी 90 सें.मी. खोल काढून त्यातून मातीचा नमुना घ्यावा.
- रिकाम्या खड्डयाच्या भिंती सर्व बाजूंनी वरपासून खालीपर्यंत सारख्या जाडीने तासावी व ती स्वच्छ घमेल्यात घेऊन गोणपाटावर पसरावे. अशा तऱ्हेने प्रत्येक खड्ड्यातील माती गोणपाटावर घेऊन चांगली एकत्र मिसळावी. तिचे चार समान भाग करावते. समोरासमोरचे दोन भाग वगळावेत. अशा तऱ्हेने शेवटी आर्धा ते पाऊण किलो पर्यंत माती शिल्लक राही पर्यंत असे करावे.
- माती ओलसर असल्यास सावलीत वाळवून नंतर मातीचा नमुना प्लॅस्टिक/ कागदी पिशवीत भरुन माहितीचा फॉम सोबत जोडून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावा.

चित्र क्र. 1



या ठिकाणी खड्डे घ्यावेत.

चित्र क्र. 2




30 सें.मी. व्ही आकाराचा खड्डा

चित्र क्र. 3




गोळा केलेल्या मातीचे असे भाग पाडावेत


श्रम साधना, अमरावती

**कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर (बडनेरा), जि. अमरावती.**

Email : pckvkda2015@gmail.com

डॉ. एच.व्ही. ठाकूर : 8308010038 / 8263974537